# बोर्ड प्रश्नपत्रिका : फेब्रुवारी २०२४

## चिटणिसाची कार्यपद्धती

**वेळ: ३ तास** **एकूण गुण : ८०**

**सूचना :** (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
(२) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.
(३) डावीकडील अंक प्रश्नांचे क्रमांक दर्शवितात.
(४) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पानावर करावा.

---

**प्र.१. (अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा :** (५)[२०]

(१) वित्त म्हणजेच कंपनीच्या _______ बाबींचे व्यवस्थापन करणे.
(अ) आर्थिक (ब) विपणन (क) उत्पादन

(२) कंपनी सार्वजनिक स्वरूपात कमीत कमी _______ महिन्यांसाठी ठेवींचा स्वीकार करू शकते.
(अ) नऊ (ब) सहा (क) बारा

(३) कंपनी _______ परिवर्तनीय कर्जरोख्यांची विक्री करू शकते.
(अ) फक्त अंशत: (ब) फक्त पूर्णत: (क) अंशत: व पूर्ण

(४) कर्जरोख्यांद्वारे जमा केलेले भांडवल हे कंपनीचे _______ भांडवल असते.
(अ) कर्जाऊ (ब) मालकीचे (क) कायम

(५) _______ हा कंपनीने धनकोंना दिलेला परतावा आहे.
(अ) लाभांश (ब) व्याज (क) भाडे

**(ब) जोड्या जुळवा :** (५)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) भांडवली अर्थसंकल्प | (१) असुरक्षित कर्जरोखे |
| (ब) दिलगिरी पत्र | (२) १९५६ |
| (क) संचालक मंडळ | (३) गुंतवणुकीचा निर्णय |
| (ड) डिपॉझिटरी कायदा | (४) भागांचे वाटप |
| (इ) अंतिम लाभांश | (५) संचालक मंडळाकडून निश्चिती व घोषणा |
| | (६) वित्तीय निश्चितीचा निर्णय |
| | (७) संचालक मंडळाकडून निश्चिती व सभासदांकडून घोषणा |
| | (८) १९९६ |
| | (९) कर्जरोखे विक्रीचा अधिकार |
| | (१०) भाग वाटप न करणे |

Target Publications

**(क) खालील गटात न बसणारा शब्द शोधा :** (५)

(१) कर्जरोखे, सार्वजनिक ठेवी, संचयी मिळकत (प्रतिधारण नफा)

(२) बोनस भाग, हक्क भाग, कर्मचारी भाग विकल्प योजना (ESOS)

(३) खाजगी कंपनी, अपात्र सार्वजनिक कंपनी, सरकारी कंपनी

(४) डिपॉझिटरी, डीपी, आरबीआय.

(५) खाजगीरित्या विक्री, व्यापारी पतपत्र, नंतरची सार्वजनिक विक्री (FPO)

**(ड) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा :** (५)

(१) मालकीचे भांडवल हे तात्पुरते / हंगामी भांडवल आहे.

(२) एफपीओ म्हणजे जनतेला पहिल्यांदा भागांची सार्वजनिक विक्री करणे.

(३) लाभांशाची शिफारस भागधारकांकडून केली जाते.

(४) ठेवी दीर्घ मुदतीसाठीचा भांडवलाचा स्त्रोत आहे.

(५) भागबाजार हा नाणे बाजाराचा एक महत्त्वाचा घटक आहे.

**प्र.२. खालील संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा (कोणत्याही चार) :** [८]

(१) स्थिर भांडवल (२) कर्जाऊ भांडवल (३) बोनस भाग

(४) डिपॉझिटरी पद्धती (५) दुय्यम बाजार (६) भाग बाजार

**प्र.३. खालील घटना / परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा (कोणतेही दोन) :** [६]

(१) व्हॉयलेट लिमिटेड कंपनीचा कर्जरोख्यांची विक्री करून ₹१० कोटी भांडवल उभारणी करण्याचा विचार / नियोजन आहे. संचालक मंडळाला त्याबाबतीत काही अडचणी / शंका आहेत. कृपया सल्ला द्या :

(अ) कंपनी परिवर्तनीय कर्जरोख्यांची विक्री करू शकते का?

(ब) कंपनीने आपल्या सभासदांना कर्जरोखे देऊ केले असतील तर अशा कर्जरोख्यांवर सर्वसाधारण मतदानाचे हक्क मिळतील का?

(क) कर्जरोखे विक्री करून उभारलेले भांडवल कोणत्या प्रकारचे असेल-मालकीचे भांडवल की कर्जाऊ भांडवल?

(२) श्री. सतीश यांनी 'राज' कंपनी लिमिटेड चे १०० भाग भौतिक स्वरूपात धारण केले असून ते इलेक्ट्रॉनिक स्वरूपात बदलण्याची त्यांची इच्छा आहे.

(अ) श्री. सतीश यांचे 'एस. बी. आय.' बँकेत बचत खाते आहे. या खात्यात डिमॅटसाठी त्यांचे भाग जमा केले जाऊ शकतात का?

(ब) त्यासाठी कोणत्या प्रकारचे खाते आवश्यक आहे?

(क) डिमॅट नंतर श्री. सतीश यांच्या समभागाचे परिरक्षक आर. बी. आय. असेल का?

(३) 'गोल्ड' कंपनी लिमिटेड ने आर्थिक वर्ष २०१९-२०२० साठी ₹१०/- प्रतिभाग लाभांश जाहीर केला आहे.

(अ) लाभांश जाहीर केल्यापासून ३० दिवसांच्या आत वाटप न केल्यास कंपनी ने कर्तव्य करण्यात कसूर केली आहे असे होईल का?

(ब) कंपनीने न दिलेला लाभांश कर्जरोखा राखीव निधी खात्यात वर्ग करणे योग्य आहे का?

(क) ३० दिवसांनंतर न दिलेला लाभांश कंपनीला 'आयईपीएफ' ला वर्ग करावा लागेल का?

Target Publications

**प्र.४. खालील फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) :** **[१२]**

(१) स्थिर भांडवल व खेळते भांडवल

(२) हक्क भाग व बोनस भाग

(३) डिमटेरियलायझेशन व रिमटेरियलायझेशन

(४) लाभांश व व्याज

**प्र.५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[८]**

(१) कर्मचारी भाग विकल्प योजना स्पष्ट करा.

(२) ठेवींच्या स्वीकृती बाबतच्या कोणत्याही चार अटी व नियम लिहा.

(३) अंतरिम लाभांशाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**प्र.६. खालील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) :** **[८]**

(१) बंधपत्रधारक कंपनीचा धनको असतो.

(२) कंपनीला सुरक्षित कर्जरोख्याची विक्री करताना आपल्या / तिच्या मालमत्तेवर बोजा निर्माण करावा लागतो.

(३) भांडवल बाजार व्यवसाय क्षेत्रासाठी उपयुक्त आहे.

(४) भागबाजार हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी कार्य करतात.

**प्र.७. खालील प्रश्न सोडवा (कोणतेही दोन) :** **[१०]**

(१) लाभांशाचे वाटप लाभांश अधिपत्राद्वारे केल्याचे कळविणारे पत्र भागधारकास लिहा.

(२) इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे कर्जरोख्यावरील व्याज देण्याबाबतचे पत्र कर्जरोखेधारकास लिहा.

(३) ठेवीदारास ठेवीचे नूतनीकरण करण्याबाबतचे पत्र तयार करा.

**प्र.८. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणताही एक) :** **[८]**

(१) अग्रहक्क भाग म्हणजे काय ? अग्रहक्क भागांचे प्रकार सविस्तर स्पष्ट करा.

(२) कंपनी कायदा २०१३ मधील कर्जरोखे विक्रीच्या तरतुदी स्पष्ट करा.

Target Publications